# नापास लेकांचं सेलिब्रेशन

## परीक्षेत नापास झालाय, आयुष्यात नाही

**मुंबई–** राज्यातील १२ वी बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून उत्तीर्ण विद्यार्थ्यांकडून पेढे वाटून, केक कापून हा आनंद साजरा केला जात आहे. दुसरीकडे नापास विद्यार्थ्यांना धीर देण्याचं कामही सोशल मीडियातून होत आहे. परीक्षा ही १२ वीची होती, आयुष्याची नाही, त्यामुळे अपेक्षित यश न मिळालेल्या विद्यार्थ्यांनी खचून न जाता पुन्हा नव्याने जोमाने परीक्षेला सामोरे गेले पाहिजे. त्यासह, परीक्षेत जरी कमी गुण मिळाले असले तरी आपल्या आवडीच्या क्षेत्रातील करिअर निवडले पाहिजे, असेही मार्गदर्शन केले जात आहेत. त्यातच, कर्नाटकच्या बागलकोटमधील एका पालकांनी आपल्या नापास मुलाच्या निकालाचा आनंद व्यक्त केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

बोर्डाच्या परीक्षेला भविष्याचा पाया म्हणून पाहिलं जातं. त्यामुळे, बोर्ड परीक्षेत कमी गुण मिळाले किंवा बोर्डाच्या परीक्षेत आपला मुलगा वा मुलगी नापास झाल्यास पालकांकडून रागावण्यात येते. पालकांकडून बोलणे खावे लागतात. मात्र, कर्नाटकच्या बागलकोट येथील एका पालक दाम्पत्याने चक्क आपल्या नापास मुलाचे सेलिब्रेशन केलं आहे. विशेष म्हणजे या विद्यार्थ्याला १० वीच्या बोर्ड परीक्षेत केवळ ३२ टक्के गुण मिळाले आहेत. बागलकोट जिल्ह्यात



राहणाऱ्या अभिषेक चोलाचगुड्डा हा येथील बसवेश्वर इंग्लिश मीडियम स्कूलचा विद्यार्थी. विशेष म्हणजे यंदा तो १० वीच्या बोर्ड परीक्षेत शिक्षण घेत होता. त्यामध्ये, अभिषेकला ६०० पैकी फक्त २०० गुण मिळाले आहेत. म्हणजे (जवळपास ३२%) गुण प्राप्त झाले आहेत. विशेष म्हणजे तो सहाच्या सहा विषयात नापास झाला आहे. त्यामुळे, त्याचे मित्र आणि काही शेजारी, नातेवाईक यांच्याकडून त्याची खिल्ली उडवण्यात येऊ लागली. मात्र, आपल्या मुलाची खिल्ली उडवणाऱ्यांना अभिषेकच्या पालकांनी चांगलीच चपराक लावली आहे. कारण, आपल्या नापास मुलाच्या गुणवत्तेवर नाराज न होता, केक कापून आई-वडिलांनी त्याचे सेलिब्रेशन केले. तू परीक्षेत नापास झाला असशील, पण आयुष्यातील परीक्षेत होणार नाही, असे म्हणत अभिषेकला त्याच्या आई-वडिलांनी जादू की झप्पी दिली. सध्या अभिषेक आणि त्याच्या आई-वडिलांचा हा व्हिडिओ तुफान व्हायरल होत आहे.

# नगर जिल्ह्यात पहिल्यांदा मंत्रिमंडळाची बैठक

## चौंडीतील नियोजन पूर्ण

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त चोंडी येथे आज (दि. ६) होत असलेल्या मंत्रिमंडळ बैठकीला दुपारी साडेबारा वाजता सुरुवात होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली ही मंत्रिमंडळ बैठक दीड तास चालणार असून यासाठी खास जर्मन हँगर प्रकारचा मंडप उभारण्यात आला. दरम्यान, नगर जिल्ह्यात पहिल्यांदा होणाऱ्या या बैठकीकडे राज्याचे लक्ष राहणार असून नगरसह राज्याला महायुती सरकार काय नवीन देणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

राज्याच्या मंत्रिमंडळातील सर्व मंत्री, विविध विभागांचे सचिव, आमदार यांच्यासाठी या ठिकाणी वातानुकूलित भव्य मंडपासह विविध कक्ष उभारण्यात आहेत. तसेच साडेतीन हजार खुर्च्यांची व्यवस्था केली आहे. राज्य मंत्रिमंडळाची पहिलीच बैठक ग्रामीण भागात चौंडीमध्ये होत आहे. या बैठकीच्या निमित्ताने अहिल्यानगर जिल्ह्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सृष्टी, संत ज्ञानेश्वर सृष्टी, भुईकोट किल्ला संवर्धन, पेडगाव किल्ला येथे छत्रपती संभाजी महाराज स्मारक, तसेच जिल्ह्याच्या औद्योगिक विकास आराखड्याला मोठा निधी मिळण्याची शक्यता आहे. यासह राज्य सरकार अहिल्यादेवींच्या भूमीतून कोणती नवीन घोषणा करणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. मंत्रिमंडळाच्या या बैठकीसाठी गेल्या १५ ते २० दिवसांपासून जोरदार नियोजन सुरू असून राज्यातील बड्या अधिकाऱ्यांसह जिल्हा प्रशासनाची यासाठी धावपळ सुरू आहे. ऐन उन्हाळ्यात होणारी ही बैठक यशस्वी करण्यासाठी अधिकाऱ्यांच्या डोक्याला घाम आलेला दिसत आहे.

**नगरी भोजनाचा पाहुणचार**

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्रिमंडळ, सचिव यांच्यासह ६०० व्हीव्हीआयपीसह २ हजार लोकांच्या भोजनाची व्यवस्था बचत गटातील महिलांकडे देण्यात आली आहे. यात जिल्ह्यातील प्रसिद्ध असलेले १५-२० विविध पदार्थ बनवले जाणार आहेत. त्यात शिपी आमटी, आमरस, शेंगोळे, थालीपीठ, वांग्याचे भरीत, डाळबट्टी, दही धपाटे आदी पदार्थांचा समावेश असून मंत्री, आमदार आणि सचिवासांठी चांगलीच मेजवानी ठरणार आहे. या ठिकाणी सुरूची जेवणासह आवश्यक सर्व सुविधा सज्ज ठेवण्यात आल्या असून आरोग्य विभागाचे पथक तैनात राहणार आहे.

**प्रत्येक मंत्र्यांसाठी स्वतंत्र संपर्क अधिकारी**

मंत्रिमंडळाच्या या बैठकीसाठी जिल्हा प्रशासनाच्यावतीने स्वतंत्र संपर्क अधिकारी नेमण्यात आले प्रत्येक शासकीय विभागावर जबाबदारी सोपवण्यात आली आहे. सोमवारी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आसिया यांच्यासह अधिकाऱ्यांचे पथक चोंडीत होते. त्यांनी मंत्रीमंडळाच्या बैठकीचे नियोजन अंतिम केले.

**दुपारी वाजता मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री पोहणार**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाश शिंदे यांच्यासह संपूर्ण मंत्रिमंडळ बैठकीला उपस्थित राहणार आहे. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचे दुपारी बारा वाजाता हेलिकॉप्टरने चोंडी येथे आगमन होणार आहे. यासाठी पाच हेलिपॅड तयार करण्यात आले आहे. मान्यवरांच्या अगमनानंतर अहिल्यादेवींच्या स्मारकाला अभिवादन करून दुपारी साडेबारा वाजता मंत्रिमंडळ बैठकीला प्रारंभ होईल. सुमारे दीड तास ही बैठक चालणार आहे. बैठक संपल्यानंतर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत पत्रकार परिषद होवून मंत्री, आमदार, अधिकारी आणि इतर पाहुण्यांच्या भोजनाचा कार्यक्रम होणार आहे. यानंतर पुढील कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री अहिल्यानगर येथे हेलिकॉप्टरने येणार आहेत.

**नगरमध्ये भरगच्च कार्यक्रम**

चोंडीतील बैठक संपवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दुपारी ३.३० वाजता डॉ. विखे पाटील फाउंडेशन विळद येथे आगमन होणार आहे. या ठिकाणी विखे पाटील मेडिकल कॉलेजच्या नूतन होस्टलेचे उद्घाटन होणार असून त्यानंतर भाजपच्या नूतन कार्यालयाचे भूमीपूजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. त्यानंतर पावणे पाच वाजता मुख्यमंत्री भाजप कार्यकर्त्यांशी संवाद साधणार असून हा कार्यक्रम सहकार सभागृहात होणार आहे. त्यानंतर नवीन शासकीय विश्रामगृहाचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे.

# भारताने विकसित केली जगातील पहिली जीनोम संपादित भाताची वाण

**नवी दिल्ली–** भारतीय कृषी संशोधन परिषदेने जीनोम एडिटिंग (संपादित) करून भाताच्या दोन नवीन जाती विकसित केल्या आहेत, ज्यांची विशेषता कमी खर्च, कमी पाणी आणि कमी वेळेत अधिक उत्पादन आहे. यामुळे ३० टक्क्यांपर्यंत भाताचे उत्पादन वाढेल आणि हवामान बदलाच्या आव्हानांना कमी करण्यास मदत मिळेल. पहिल्या वाणाचे नाव कमला (डीआरआर-१००) आहे आणि दुसऱ्याचे नाव डीएसटी राईस-१ आहे. कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी रविवारी हे जारी केले.

जीनोम संपादित भातापासून तांदळाच्या जाती विकसित करणारा भारत जगातील पहिला देश ठरला आहे. चौहान यांनी याला कृषी संशोधनाच्या क्षेत्रातील भारताची ऐतिहासिक उपलब्धी असल्याचे म्हटले आहे. या जाती देशात दुसरी हरितक्रांती घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतील. लवकरच त्या शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून दिल्या जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**जीनोम तंत्रज्ञानाने तयार, हवामान बदलाशी लढण्यास मदतगार**

देशात विकसित जगातील पहिल्या दोन जीनोम संपादित भाताच्या जातींचा विकास वैज्ञानिक संशोधनातील नवोन्मेषाची सुरुवात आहे. या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मूळ डीएनए मध्ये सूक्ष्म बदल करून पिकांची नवीन वाण तयार केली जाते. सामान्य पिकांमध्ये अशा बदलांना केंद्र सरकारच्या जैव सुरक्षा नियमांअंतर्गत मंजुरी प्राप्त आहे. भारतीय कृषी संशोधन परिषद २०१८ पासून दोन्ही जाती विकसित करण्यासाठी काम करत होते. या जाती



छत्तीसगड, मध्य प्रदेश, ओडिशा, झारखंड, बिहार, उत्तर प्रदेश, बंगाल, आंध्र प्रदेश, तेलंगणा, केरळ, कर्नाटक, तामिळनाडू आणि महाराष्ट्रातील कृषी परिस्थितीनुसार विकसित केल्या गेल्या आहेत.

**४५ लाख टनांपर्यंत वाढेल उत्पादन, सिंचनात घट**

या राज्यांमध्ये या जातींची शेती केल्याने सुमारे ४५ लाख टन अधिक भाताचे उत्पादन होईल. ग्रीन हाऊस वायूंच्या उत्सर्जनात २० टक्के म्हणजेच ३२०० टनांची घट येईल. पीक तयार होण्यास २० दिवस कमी लागल्याने जवळपास तीन वेळा सिंचन कमी लागेल. लवकर तयार झाल्याने पुढील पिकाची पेरणी वेळेवर होऊ शकेल.

कमला ही जीनोम तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या भारतीय भात संशोधन संस्थेने (हैदराबाद) बारीक दाण्याची वाण सांबा महसुरी (बीपीटी ५२०४) पासून विकसित केली आहे. सुधारित बियाण्यात मूळ वाण सांबा महसुरीच्या तुलनेत दाण्यांची संख्या जास्त असेल. याला कमी सिंचनाची गरज भासेल आणि ते २० दिवस लवकर तयार होईल. चाचणीत कमलाची सरासरी उपज प्रति हेक्टर ५.३ टन आढळली आहे, जी सांबा महसुरीपेक्षा जवळपास २० टक्के अधिक आहे. अनुकूल परिस्थितीत ते ३० टक्क्यांपर्यंत वाढू शकते.

पूसा डीएसटी राईस-१: दक्षिण भारतासाठी वरदान

दुसरी वाण पूसा डीएसटी राईस-१ आहे, जी खउठ (पूसा, नवी दिल्ली) ने विकसित केली आहे. याचा दाणा लांब आणि बारीक असेल. दक्षिण भारतातील रब्बी हंगामासाठी हे अत्यंत उपयुक्त आहे. ते आपल्या मूळ वाण एमटीयू १०१० च्या तुलनेत २० टक्के अधिक उपज देईल.

कमला वाणाच्या विकासासाठी डॉ. सत्येंद्र कुमार मंग्राउथिया, डॉ. आर. एम. सुंदरम, डॉ. आर. अब्दुल फियाज, डॉ. सी. एन. नीरजा आणि डॉ. एस. व्ही. साई प्रसाद तसेच पूसा डीएसटी राईससाठी डॉ. विश्वनाथन सी, डॉ. गोपाल कृष्णनन एस, डॉ. संतोष कुमार, डॉ. शिवानी नागर, डॉ. अर्चना वत्स, डॉ. रोहम रे, डॉ. अशोक कुमार सिंह, डॉ. प्रांजल यादव, राकेश सेठ, ज्ञानेंद्र सिंह आदींचे मोठे योगदान आहे.

# घारगाव पोलिसांनी गुटखा वाहतूक करणारे वाहन पकडले

## ८ लाख २२ हजार रुपयांचा मुद्देमाल केला जप्त

**संगमनेर (तालुका प्रतिनिधी)–** पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील माहुली फाटा येथे अवैधरित्या गुटखा वाहतूक करणारी पिकअप सोमवारी (दि.५) सकाळी ११ वाजता घारगाव पोलिसांनी पकडली. या कारवाईत वाहनासह ८ लाख २२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, की पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांना गोपनीय बातमीदाराकडून संगमनेरकडून घारगावच्या दिशेने अवैधरित्या गुटख्याची वाहतूक होणार असल्याचे समजले. त्यानुसार त्यांनी तत्काळ पोकॉ. सुभाष बोडखे, पोकॉ. गाडेकर कारवाईच्या सूचना दिल्या. त्यानंतर पोलिसांनी आंबीखालसा ग्रामपंचायतला पत्र देऊन सरकारी पंच देण्याची मागणी केली. पंचांसह पोलीस माहुली फाटा येथे थांबले असता पांढऱ्या रंगाची पिकअप (क्रमांक एमएच.१७, बीवाय.८५५६) सकाळी सव्वाअकरा वाजेच्या सुमारास येताना दिसली. सदर वाहनावरील चालकास थांबण्याचा इशारा केला असता




त्याने वाहन रस्त्याचे कडेला घेतले. त्यानंतर चालक प्रभाकर अण्णासाहेब गुळवे (वय ३९ वर्षे, रा. रणखांब, ता. संगमनेर) यास वाहनाच्या पाठीमागे काय आहे असे विचारले असता त्याने उडवाउडवीची उत्तरे देण्यास सुरुवात केल्याने तपासणी केली असता ३ लाख ३७ हजार रुपयांचा हिरा पानमसाला, ८४ हजार ४८० रुपयांची रॉयल सुगंधित तंबाखू मिळून आली. पोलिसांनी पंचनामा करुन ४ लाख २१ हजार ४८० रुपयांचा गुटखा व सुगंधित तंबाखू आणि ४ लाख रुपयांची पिकअप असा एकूण ८ लाख २२ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी पोकॉ. सुभाष बोडखे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन घारगाव पोलिसांनी प्रभाकर गुळवे याच्यावर भारतीय न्यायसंहिता कलमांसह अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस करत आहे.

# बारावी : राज्याचा एकूण निकाल ९१.८८ टक्के

**पुणे (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता बारावी परीक्षेचा ऑनलाइन निकाल सोमवारी जाहीर करण्यात आला. राज्याचा एकूण निकाल ९१.८८ टक्के लागला आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा निकालात १.४९ टक्के घट झाली आहे. दरवर्षी प्रमाणे यंदाही निकालात मुलींनीच बाजी मारली आहे. मुलींचा निकाल ९४.५८ टक्के तर मुलांचा निकाल ८९.५१ टक्के लागला आहे. दरम्यान, राज्यात यंदाही कोकण विभागाचा सर्वांत जास्त निकाल लागला असून पहिल्या नऊ विभागात प्रथम क्रमांक पटकाविला आहे तर लातूर विभाग शेवटच्या क्रमांकावर आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी पत्रकार परिषदेमध्ये निकाल निकाल जाहीर केला. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे ११ फेब्रुवारी ते ११ मार्च २०२५ दरम्यान बारावीच्या परीक्षा घेण्यात आल्या.

पान १ वरुन

## देशभर उद्या नागरी संरक्षण मॉक ड्रिल

जम्मू आणि काश्मीरमधील पूंछ येथे सोमवारी सुरक्षा दलांना दहशतवाद्यांचा एक अड्डा सापडला. येथे ५ आयईडी, वायरलेस सेट आणि काही कपडेही जप्त करण्यात आले आहेत. हे लपण्याचे ठिकाण पूंछमधील सुरणकोट येथील मरहोत गावात सापडले. सुरक्षा दलांचे म्हणणे आहे की हे दहशतवाद्यांसाठी लपण्याचे ठिकाण आहे.

▸ भारत पाकवर कधीही हल्ला करू शकतो अशी भीती विशेष अधिवेशनात अनेक खासदारांनी भीती व्यक्त केली. दरम्यान भारताने पाकिस्तानचे पाणी बंद केल्यास तो युध्दाचा प्रयत्न समजला जाईल असा ठराव पाक संसदेने एकमताने मंजूर केला.

## जिल्ह्याचा बारावीचा निकाल ८६.३४ टक्के

संगमनेर (९३.७० टक्के) व राहाता (८९.८२ टक्के) तालुक्यांचा क्रमांक लागतो. सर्वात कमी निकाल शेवगाव (७६.६३ टक्के) तालुक्याचा लागला. बारावीच्या परीक्षेला ३३ हजार ८६६ मुले बसली होती. त्यापैकी २७ हजार ५७० पास झाली असून निकाल ८१.४१ आहे. तर २७ हजार ६५ मुली बसल्या होत्यापैकी २५ हजार ३९ मुलीपास झाल्या असून ९२.५१ टक्के निकाला आहे.

जिल्ह्यात दहावी-बारावी परीक्षेदरम्यान यंदा शिक्षण विभागाने कॉपीमुक्त अभियान जिल्ह्यात राबवले. तत्कालीन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालिमठ व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांच्या नेतृत्वाखाली शिक्षणाधिकारी अशोक कडूस व इतर शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी यात महत्वपूर्ण योगदान दिले. प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे बसवल्याने, तसेच केंद्रनिहाय पथके नेमल्याने कॉपीस आळा बसला. त्यामुळे निकाल कमी दिसत असला तरी अशा अभियानामुळे भविष्यातील शैक्षणिकदृष्ट्या वातावरण सुधारेल. त्यामुळे पालकांनीही या अभियानाचे कौतूक केले आहे. कॉपीसाठी प्रसिध्द असणाऱ्या पाथर्डी तालुक्याचा निकाल हा सर्वात कमी ८२ टक्के लागला आहे.

**तालुकानिहाय निकाल**

अकोले ८८.४२ टक्के, जामखेड ९४.८९ टक्के, कर्जत ८७.१५ टक्के, कोपरगाव ८८.२२ टक्के, नगर ८५.९३ टक्के, नेवासा ७७.३१ टक्के, पारनेर ८६.२१ टक्के, पाथर्डी ८२.२९ टक्के, राहाता ८९.८२ टक्के, राहुरी ८६.५५ टक्के, संगमनेर ९३.७० टक्के, शेवगाव ७६.६३ टक्के, श्रीगोंदा ८८.५९ टक्के आणि श्रीरामपूर ८५.५१ टक्के असा एकूण ८६.३४ टक्के आहे.

**शाखानिहाय निकाल**

विज्ञान ९४.६० टक्के, कला ६४.७३ टक्के, वाणिज्य ८६.२८ टक्के

## चौंडीच्या मंत्रिपरिषदेत धनगर आरक्षणावर चर्चा?

शकतो. ही शिल्पसृष्टी चौंडी येथे की चास येथे होणार यावरही बैठकीत शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. मंत्रिमंडळ बैठकीच्या निमित्ताने अहिल्यानगर जिल्ह्यातील धार्मिक पर्यटन, ऐतिहासिक वास्तूंचे संवर्धन यासह अनेक विकासकामे मार्गी लागतील अशी अपेक्षा आहे. शेजारच्या मध्यप्रदेश सरकारने अहिल्यादेवींच्या राज्याची राजधानी राहिलेल्या महेश्वर येथे त्रिशताब्दी वर्षानिमित्त मंत्रिमंडळाची बैठक आयोजित केली होती. त्याच धर्तीवर महाराष्ट्र सरकारने देखील अहिल्यादेवींचे जन्मगाव असलेल्या चौंडी येथे त्रिशताब्दी जन्म वर्षानिमित्त मंत्रिमंडळ बैठक आयोजित केली आहे. या बैठकीच्या माध्यमातून पुण्यश्लोक अहिल्यादेवींना अभिवादन केले जाणार आहे.

### अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची शिफारस करा

▸ समाजाला अनुसूचित जमातीत आरक्षण देण्यासाठी केंद्राकडे शिफारस करायला हवी. याविषयीचा अभ्यास यापूर्वीच झाला असून केवळ निर्णय व्हायचा असेल. हा निर्णय घेतल्यास अहिल्यादेवींच्या विचारांचा खऱ्या अर्थाने सन्मान होणार असल्याची भूमिका अभियानाचे संयोजक विक्रम ढोणे यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत मांडली.

## थोरात कारखान्याचे संचालक इंद्रजीत थोरातांवर गुन्हा दाखल

निळवंडे धरणाच्या उजव्या कालव्यातून आवर्तन सुरू आहे. जलसंपदा विभागाने कालव्यातील अनधिकृत पाईप काढण्यास सुरुवात केली असता, शेतकऱ्यांनी याला तीव्र विरोध केला. इंद्रजीत थोरात यांनी शेतकऱ्यांचे नेतृत्व करत प्रशासनाच्या कारवाईला आव्हान दिले. जलसंपदा विभागाचे सहाय्यक अभियंता प्रमोद माने यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार निमगाव पागा ते खळी पिंपरी दरम्यान अनधिकृत पाईप काढताना इंद्रजीत थोरात यांनी अटकाव केला. त्यांनी आमच्या कारखान्याने पाईप टाकले आहेत ते काढू नका. शेतकऱ्यांच्या जमिनी कालव्यासाठी गेल्या त्यांना आधी पाणी द्या, असे सांगितले. तरी देखील यावरुन गुन्हा दाखल झाला आहे. यामुळे हा वाद आणखी चिघळण्याची शक्यता आहे. मात्र, प्रशासन आणि शेतकऱ्यांमधील तणाव कसा निवळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**शेतकऱ्यांचा उद्रेक...**

• गुन्हा दाखल झाल्याने शेतकऱ्यांचा संताप अनावर झाला आहे. प्रशासन नियोजन करत नाही, हक्काचे पाणी उपसू देत नाही आणि उलट खोटे गुन्हे दाखल करतात हा अन्याय आहे. इंद्रजीत थोरात यांच्यासोबत आम्हांलाही सहआरोपी करा, अशी संतप्त भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. प्रशासनाने योग्य पर्याय काढला नाही तर आंदोलनाशिवाय आमच्याकडेही उपाय नाही.

**–रामेश्वर पानसरे** (शेतकरी-जाखुरी)

**...मग गुन्हा कोणाच्या सांगण्यावरून?**

• काल सायंकाळी प्रशासन, इंद्रजीत थोरात थोरात आणि शेतकऱ्यांमध्ये सामोपचाराने तोडगा निघाला होता. प्रशासनानेही तो मान्य केला होता. मग आता गुन्हा दाखल का झाला? हे संगमनेरला पाण्यापासून वंचित ठेवण्याचे षडयंत्र आहे. गुन्हे दाखल करायचे असतील तर आमच्यावरही करा.

**–अण्णा राहिंज** (शेतकरी-पिंपरणे)

## साई संस्थान विश्वस्त मंडळ स्थापनेच्या हालचालींना वेग

असे अनुभवी सदस्य असणे बंधनकारक आहे. सात सदस्य जिल्ह्यातील रहिवासी असावेत असाही नियम असल्याने जिल्ह्यातील अनेकांनी फिल्डिंग लावण्यास सुरुवात केली आहे. महत्वाचे म्हणजे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची महत्वपूर्ण भूमिका असणार आहे. त्यामुळे विधी व न्याय खाते असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे टिकाऊ आणि सक्षम नवीन विश्वस्त मंडळ स्थापन करतील हाच विश्वास भाविकांना आहे. मात्र गेल्या काही वर्षांपासून गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेले इच्छुक आता मुंबई वाऱ्या करत आहेत.

## विक्रम पाचपुते हाजीर हो..!

न्यायालयाने श्रीगोंदा पोलीस निरीक्षकांना दोघांना पकडून न्यायालयासमोर उपस्थित करण्याचा आदेश दिला आहे. दरम्यान, माजी आ.बबनराव पाचपुते यांच्या कुटुंबाचा मालकी हक्क राहिलेला आणि आता गौरी शुगरचे अध्यक्ष बाबुराव बोत्रे पाटील यांच्याकडे असलेला हिरडगावच्या साईकृपा साखर कारखान्याच्य जुन्या अडचणी अद्यापही पाचपुते कुटुंबाची पाठ सोडतांना दिसत नाहीत. आ. विक्रम पाचपुते आणि कारखान्यांचे व्यवस्थापक धनादेश अनादर प्रकरणात न्यायदंडाधिकारी वर्ग न्यायालय क्रमांक दोन यांनी पकड वॉरंट बजावले आहेत. श्रीगोंदा पोलिसांनी या दोघांना पकडून माझ्यासमोर हजर करावे. यात कोणतीही चूक होता कामा नयेत, असे पकड वॉरंटमध्ये म्हटले आहे.

## राहुरीत अवकाळीचा तडाखा

जातप, करजगाव, टाकळीमिया आदी परिसरात काल दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाला सुरूवात झाली. तालुक्यातील उत्तर भागातील लाख, जातप, करजगाव भागात वादळी वाऱ्यासह गारपीट झाली.

## टाकळीभान, उक्कलगाव शनी शिंगणापुरातही गारा

दिलेल्या माहितीनुसार शनी शिंगणापूर परिसरातही वादळी पावसासह गारांचा पाऊस झाला. काल सोमवारी दुपारी सुमारे एक वाजल्यापासून आकाशात ढग जमा झाले होते. ढगाळ वातावरणामुळे उकाड्यात प्रचंड वाढ झाली होती. सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास आचानक अवकाळी पावसाला सुरुवात झाली. काही ठिकाणी बोराच्या आकाराच्या गारांचा खच पडायला सुरूवात झाली होती. पंधरा ते वीस मिनिट अवकाळी पावसाने जोरदार बटींग केली. या आवकाळी पावसानंतर उकाड्याने हैराण झालेल्या नागरीकांना सुखद गारवा मिळाला. येथील शभू महादेवाच्या यात्रोत्सवाला काल सोमवारपासून सुरूवात झाल्याने विविध वस्तुंची, खाद्य पदार्थांची, खेळणीची दुकान थाटली होती. पावसामुळे आठवडे बाजारातील भाजीपाला विक्रेते व बाजारकरुंची चांगलीच पळापळ झाली. कांदा काढणी अंतीम टप्प्यात असली तरी शेतकऱ्यांचीही चागलीच पळापळ होतांना दिसून आली.

## पारनेरच्या वन्यकुटेला गारपिटीचा तडाखा

सध्या कडक उन्हाच्या झळा बसत असतानाच सोमवारी दुपारी दोननंतर आकाशात ढग जमा होण्यास सुरुवात झाली. त्यानंतर वादळी वारा व विजेच्या कडकडाटासह वरुणराजा बरसला. वनकुटे, सुपा, ढवळपुरीसह पारनेर तालुक्यातील अनेक गावांत अवकाळी पावसाने हजेरी लावली. या पावसामुळे कांदा पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. तालुक्यातील वनकुटे येथे मोठ्या प्रमाणात गारा पडल्या आहेत. राज्यात गेल्या दोन ते तीन दिवसांपासून अवकाळी पावसासह गारपीट होत आहे. अचानक आलेल्या या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. हातातोंडाशी आलेला घास हिरावल्यामुळे बळीराजा चिंतेत आला असून त्याच्या डोळ्यात पाणी आले आहे. एका रात्रीत शेतातील पीक आडवं झाले आहे. शेतकऱ्यांच्या आंबा, पपई यासह सर्व फळबागांचे नुकसान झाले आहे. त्याचसोबत लिंबू, कांदा या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. मोठ्या प्रमाणात कैऱ्यांचा सडा पडला. अनेक ठिकाणी जोराच्या वादळ वाऱ्यामुळे शेतकऱ्यांच्या कांदा पिकावर टाकलेला कागद उडून गेला असून कांदा पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांची सध्या उन्हाळी कांदा भुसाऱ्यात साठवण्याची लगबग सुरु आहे. औद्योगिक वसाहतीमुळे मजूर मिळत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना परप्रांतीय किंवा विदर्भ, मराठवाड्यातील मजूर जोडीने बोलावे लागतात. सध्या कांद्याला भाव नसताना आता आसमानी संकटाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. सोमवारी पडलेल्या अवकाळी पावसाने उष्णतेपासून थोडा दिलासा मिळाला असला तरी पावसामुळे शेतमालांचे नुकसान झाले आहे.

**तालुक्यातील वनकुटा परिसारात झालेल्या गारपिठीमुळे गावासह शेतात गारांचा खच पडला होता. येथील शेतकरी बबनराव काळे यांच्या फ्लावर कलिंगड पिकाचे मोठे नुकसान झाले. या ठिकाणी गावात शेतात सर्वत्र पाणीच पाणी साठले होते. हवामान खात्याने पुढील काही दिवस अवकाळीचा इशारा दिला असून यामुळे गारपिठीसह वादळी पावसाचा धोका कायम राहणार आहे.**